वर्ष : ०६ | अंक: ०६ | मुंबई, मंगळवार ३१ डिसेंबर २०१९ ते सोमवार ६ जानेवारी २०२० | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 एसी लोकलमध्ये फेरीमागे केवळ दीड हजार प्रवासी

3 → नववर्षात सर्व इच्छा एकदिलाने पूर्ण करू!

आठ हजार शिक्षक नोकऱ्या गमावणार ← 4

# अखेर महाविकासआघाडीच्या २६ कॅबिनेट तर १० राज्यमंत्र्यांकडून शपथ







**मुंबई - महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आल्यानंतर जवळपास महिनाभरानंतर महाराष्ट्राला पूर्ण मंत्रिमंडळ मिळाल आहे. ठाकरे सरकारचा पहिला आणि संपूर्ण क्षमतेचा मंत्रिमंडळ विस्तार पार पडला असून २६ कॅबिनेट तर १० राज्यमंत्र्यांनी पद आणि गोपनियतेची शपथ घेतली.**

देवेंद्र फडणवीसांबरोबर उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेत राजकीय भूकंप घडवणाऱ्या अजित पवारांनी, ठाकरे सरकारमधल्या उपमुख्यमंत्रिपदाचीही शपथ घेतली. मंत्र्यांची यादी तयार करताना अनुभवी आणि नवीन चेहरे यांचा समतोल राखलेला दिसतोय. आदित्य ठाकरे, आदिती तटकरे, प्राजक्त तनपुरे या तरुण चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी देण्यात आली आहे. तर मंत्रिमंडळात पश्चिम महाराष्ट्राला झुकतं माप देत विदर्भ आणि इतर काही प्रांतावर अन्याय झाल्याचा सूर ऐकयाला मिळत आहे. महाविकास आघाडी

उर्वरित पृष्ठ 3 वर



# अखेर आयुक्तांना आली जाग

## स्थानिक नागरिकांना मिळवून दिला त्यांचा अधिकार

**भाईंदर : भाईंदर पूर्वेला सामान्यांसाठी असलेल्या सुभाषचंद्र बोस मैदानात महापालिका आणि लोकप्रतिनिधींनी तब्बल ८० लाखांच्या खर्चाचे भले मोठे व्यासपीठ व आलिशान खोल्या बांधण्याचे काम सुरू केल्याने खेळाडू व नागरिकांनी विरोध केला आहे. आयुक्त बालाजी**



**खतगावकर यांनी गुरुवारी पाहणी केली असता ही बाब चुकीची असल्याचे स्पष्ट करत काम थांबवण्याचे आदेश दिले.**

मिठागराच्या जागेत कचरा व मातीभराव करून तयार केलेले बोस मैदान हे मुर्धा, भाईंदर आदी भागांतील ग्रामस्थांनाच नव्हे तर

### खेळाडूंकडून तक्रारींचा पाऊस, शहरातील नागरिकांसाठी एकमेव मैदान

शहरातील सर्वसामान्यांसाठी एकमेव मैदान आहे. या ठिकाणी सकाळी व सायंकाळी मोठ्या संख्येने खेळाडू व नागरिक खेळण्यासाठी येतात. त्यातही शनिवारी, रविवारी खेळाडूंची गर्दी असते. या आधी मैदान शनिवारी, रविवारी व सुटीच्या दिवशी हमखास खाजगी संस्था, व्यक्ती वा संघटनांना पालिका राजकीय संगनमताने भाड्याने देत होते. यामुळे खेळाडूंना हुसकावून लावले जायचे. अखेर, याप्रकरणी खेळाडूंच्या व्यथा आयुक्त बालाजी खतगावकर यांच्याकडे मांडल्यानंतर त्यांनीही गांभीर्याने दखल घेत शहरातील सर्वच खेळाची मैदाने शनिवारी, रविवारी भाड्याने देण्यास बंद केले. नियमाप्रमाणे वर्षातून केवळ ३० दिवसच मैदान हे धार्मिक कार्यक्रमांसाठी भाड्याने देण्याची तरतूद आहे. परंतु, त्याचेही सातत्याने उल्लंघन केले जात आहे.

### खेळाडू अधिकाऱ्यावर भडकले

सध्याच्या व्यासपीठाजवळच आकार वाढवून मुलींसाठी स्वच्छतागृह करा. इतका खर्च करून व्यासपीठाचा वापर वर्षातून दोन ते चार वेळाच होतो. यावेळी खांबित यांनी खेळपट्टी, मैदानासाठी नुकताच एक कोटी खर्च केल्याचे सांगताच खेळाडू संतप्त झाले. खेळपट्टी निकृष्ट, तर नेटही अवास्तव खर्चाने तयार केल्याचे सांगत एकूणच नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी थांबवा, अशी मागणी केली.

दरम्यान, महासभेतील ठरावानंतर प्रशासनाने सारासार विचार न करताच तब्बल ८० लाख खर्चाचे स्टेज व आलिशान खोल्यांसाठी कंत्राट दिले. २०० फूट

उर्वरित पृष्ठ 3 वर

# मानवी हक्क आयोगाकडून पोलिसांना २ लाखांचा दंड

## हॉटेल व्यवस्थापकास केली होती मारहाण



**जळगाव रस्त्यावरील हॉटेल विधाता (किन्होळा) येथे रात्री ११ वाजता पोलिसांनी व्यवस्थापकाकडे दरमहा २ हजारांची खंडणी मागितली. त्याने नकार दिल्याने मारहाण करून त्याच्या विरोधात खोटा गुन्हा नोंदवण्यात आला. पुढे हा प्रकार खोटा असल्याचे सिद्ध झाले. तक्रारकर्त्याने मानवी हक्क आयोगाकडे धाव घेतली अन् १३ वर्षांनंतर तक्रारदाराला पोलिसांनी २ लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, असे आदेश आयोगाने दिले.**

औरंगाबाद - जळगाव रस्त्यावरील हॉटेल विधाता (किन्होळा) येथे रात्री ११ वाजता पोलिसांनी व्यवस्थापकाकडे दरमहा २ हजारांची खंडणी मागितली. त्याने नकार दिल्याने मारहाण करून त्याच्या विरोधात खोटा गुन्हा नोंदवण्यात आला. पुढे हा प्रकार खोटा असल्याचे सिद्ध झाले. तक्रारकर्त्याने मानवी हक्क आयोगाकडे धाव घेतली अन् १३ वर्षांनंतर तक्रारदाराला पोलिसांनी २ लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, असे आदेश आयोगाने दिले. त्यानुसार तक्रारदार गनी रमजान पठाण यांना दोन लाख रुपयांचा धनादेश ग्रामीण पोलिस आयुक्तालयाकडून देण्यात आला. जितेंद्र जैस्वाल यांचे हे हॉटेल आहे. ते वडोदबाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीत येते. तेथे सुधाकर सुरडकर नावाचे सहायक पोलिस निरीक्षक होते. २४ जानेवारी २००५ ला रात्री पावणेअकरा वाजता ते हॉटेलवर गेले. त्यांनी हॉटेलचालक गनी पठाण यांच्याकडे दरमहा २ हजार रुपये हप्ता देण्याची मागणी केली. गनी यांनी नकार दिल्यानंतर त्यांनी गनी यांना मारहाण केली. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला. या मारहाणीत गनी यांच्या कानाला दुखापत झाली होती. त्यांची तक्रार पोलिसांनी घ्यावी यासाठी जैस्वाल व गनी यांनी पोलिस अधीक्षकांपासून ते महासंचालकांपर्यंत सर्वांकडे अर्ज केले. जिल्हाधिकाऱ्यांपासून थेट मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. परंतु त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. त्यानंतर त्यांनी १२ मे २००५ ला मानवी हक्क आयोगाकडे धाव घेतली होती.

दरम्यानच्या काळात सुरडकर यांची विभागीय चौकशी करण्यात आली. त्यात ते दोषी आढळून आले होते. गनी यांच्या कानाला कायमची बधिरता आली. त्यामुळे त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी ही मागणी आयोगासमोर कायम होती. त्यानुसार आयोगाने

उर्वरित पृष्ठ 3 वर

# नव्या वर्षातही रोजगार संकटात

## पगारवाढीचंही काही खरं नाही!




नवी दिल्ली – जीडीपीच्या (एकूण देशांतर्गत उत्पादन) वृद्धिदराने सहा वर्षांतील नीचांक नोंदवल्याने रोजगारक्षेत्रासदेखील मोठा फटका बसत असल्याचे दिसून येत आहे. जीडीपी दरातील या घसरणीमुळे चालू वर्षाच्या उत्तरार्धातील घटत्या रोजगारवाढीचे सत्र नववर्षातही कायम राहील, असा अंदाज या क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला आहे. विविध आस्थापनांकडून आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नोकरभरती करण्याऐवजी उपलब्ध कर्मचाऱ्यांचा कौशल्यविकास करण्यावर भर दिला जाईल. तसेच, या कंपन्या पगारवाढही टाळतील, असे विश्लेषकांनी म्हटले आहे.

उर्वरित पृष्ठ 3 वर



सोशल राईट्स फाऊंडेशन या मानव अधिकारासाठी लढणाऱ्या एकमेव संघटनेच्या सल्लागार पदी अ‍ॅड. सोनल मिशाळ यांची नेमणूक करण्यात आली. सदर प्रसंगी संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक व अंधेरी सहार विभाग कमिटीचे पदाधिकारी मुकेश जाधव, प्रविण सुर्वे, सुरेश परबते, किशोर मुल्या, शैलेश जठार आदी मान्यवर उपस्थित होते.

# पालघर जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी बेदकारपणे वाहन चालवणाऱ्या रोड रोमियोंची पोलीसांकडून धरपकड

जव्हार, पालघर, डहाणू, विरार या उपविभागातील पोलीस स्टेशन अंतर्गत राष्ट्रीय व राज्य महामार्ग येतो. या महामार्गावर तसेच काही अंतर्गत रस्त्यांवर वाहन चालकांनी विशेषःत मोटार सायकल चालकांनी निष्काळजीपणे व बेदरकरपणे वाहन चालविल्याने अपघात होण्याचे प्रमाण वाढले होते. यावर ठोस उपाय योजना करण्याच्या सुचना मा. पोलीस अधीक्षक, पालघर यांनी वेळोवेळी दिल्या होत्या. त्यानुसार वेळोवेळी नाकाबंदी करून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध दंडात्मक



कारवाई करण्यात आली आहे. परंतू तरी देखील अपघातांचे प्रमाण कमी होत नव्हते याकरीता भरधाव वेगात, व वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे वाहन चालकांविरुद्ध पोलिसांनी भादविस कलम २७९, २८३ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, ३।१८१, १३०(३) । १७७, १२८ ।१७७ नुसार कारवाई करून गुन्हा दाखल केला आहे.

सर्व वाचक व हितचिंतक यांना
पोलीस बातमी पत्र
मानवाधिकार
आमच्या समुहातर्फे
नुतन वर्ष २०२० च्या
हार्दिक शुभेच्छा

# PMC घोटाळा; त्या अधिकाऱ्याने दिलेला आत्महत्येचा इशारा

**मुंबई :** देशभर गाजलेल्या पंजाब अँड महाराष्ट्र को ऑपरेटिव्ह बँकेच्या (PMC बँक) घोटाळ्याची पूर्वसूचना बँकेतील एका जागरूक कर्मचाऱ्याने (whistle blower) बँकेच्या वरिष्ठ व्यवस्थापनाला दिली होती. एचडीआयएल कंपनीच्या बनावट कर्ज खात्यांची आणि त्यात झालेल्या घोटाळ्याची माहिती रिझर्व्ह बँकेला कळवली नाही तर आत्महत्या करण्याचा इशारा या जागरूक कर्मचाऱ्याने व्यवस्थापनाला दिला होता. हा जागल्या दुसरा तिसरा कोणी असून तो बँकेचा एक कमर्चारी आहे, अशी धक्क्कादायक माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. 'टाइम्स ऑफ इंडिया'ला प्राप्त झालेल्या माहितीनुसार इश्ण बँक घोटाळ्याप्रकरणी आज दाखल केलेल्या तब्बल ३२ हजार पानी आरोप पत्रात पोलीसांनी




पहिल्यांदाच 'जागल्या'चा (whistleblower) उल्लेख केला आहे. PMC बँक घोटाळ्याचा तपास करणाऱ्या पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून ३२ हजार पानांचे आरोप पत्र आज दाखल करण्यात आले. तीन महिन्यांच्या तपासानंतर आर्थिक गुन्हे शाखेने आरोप पत्र तयार केले आहे. या आरोपत्रात पहिल्यांदाच पोलीसांनी 'जागल्या'चा (पेैतंत्दी) उल्लेख केला आहे. एचडीआयएल कंपनीची बनावट कर्ज खाती आणि त्यात घोटाळा झाल्याचे जागल्याच्या निदर्शनात आले. त्यानंतर त्याने ही बाब बँकेच्या वरिष्ठ व्यवस्थापनाला कळवली. या घोटाळ्याची माहिती रिझर्व्ह बँकेला कळवली नाही तर आत्महत्या करु, असा इशारा व्यवस्थापनाला दिला होता मात्र त्याकडे व्यवस्थापनाने दुर्लक्ष केले. या मुद्द्यावर जागल्या आणि वरिष्ठ व्यवस्थापनात प्रचंड वादावादी झाली आणि अखेर घोटाळा समोर आला. घोटाळ्यानंतर रिझर्व्ह बँकेने 'पीएमसी' बँकेवर निर्बंध घातले. यात लाखो लोकांचे पैसे अडकले असून मानसिक तणावाने काही खातेदारांना आपला जीव गमवावा लागला आहे. पोलीसांच्या तपासानुसार २०१७ मध्ये एचडीआयएलकंपनीच्या बनावट बँक खात्यांची माहिती बँकेतील काही अधिकाऱ्यांना होती, मात्र एचडीआयएल कंपनीच्या संचालकांनी बँक अधिकाऱ्यांना हाताशी धरले होते. त्यांनी बँकेतील अधिकाऱ्यांनी गप्प राहणे पसंत केले. त्यामुळेच एचडीआयएलला विनाअडथळा सहज कर्ज मिळत होते. कंपनीच्या संचालकांनी कर्ज रकमेतून देशात आणि परदेशात स्थावर मालमत्ता खरेदी केल्याचं तपासात निष्पन्न झालं आहे.

# एसी लोकलमध्ये फेरीमागे केवळ दीड हजार प्रवासी

**मुंबई-** सर्वसामान्य प्रवाशांच्या लोकल फेऱ्या रद्द करून पश्चिम रेल्वेवर दोन वर्षांपासून चालविल्या जाणाऱ्या आणि तब्बल सहा हजार इतकी आसनक्षमता असलेल्या वातानुकूलित लोकलमधून प्रति फेरी केवळ दीड हजार प्रवासीच प्रवास करत आहेत. या गाडीच्या दिवसभरात १२ फेऱ्या होतात. मात्र प्रति फेरी सरासरी दीड हजारच प्रवासी प्रवास करत असल्याने प्रवासी व उत्पन्न या उद्दिष्टापासून वातानुकूलित




लोकल सेवा दूरच असल्याचे स्पष्ट होत आहे. २५ डिसेंबर २०१७ ला पश्चिम रेल्वेवर पहिली वातानुकूलित लोकल बोरिवली ते चर्चगेट धावली. या लोकल गाडीला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली. सध्या एका वातानुकूलित लोकलच्या दिवसभरात १२ फेऱ्या होत असून चर्चगेट ते विरारदरम्यान आठ आणि चर्चगेट ते बोरिवलीदरम्यान तीन जलद लोकल फेऱ्या होतात. तर एक लोकल फेरी महालक्ष्मी ते बोरिवलीसाठी धीमी चालवण्यात येते. लोकलसाठी सामान्य लोकलच्या बारा फेऱ्या रद्द करून त्याऐवजी वातानुकूलित लोकल फेऱ्या चालवण्यात आल्या. त्यामुळे सामान्य प्रवाशांनी त्याला विरोध केला होता. मात्र या विरोधानंतरही वातानुकूलित लोकल चालवण्यात आली. गेल्या दोन वर्षांत ९५ लाख ८१ हजार प्रवाशांनी वातानुकूलित लोकलमधून प्रवास केला असून त्यातून ४० कोटी रुपये उत्पन्न मिळाले आहे. मात्र या लोकलची ५२ कोटी रुपये किंमत आणि त्याच्या देखभाल-दुरुस्तीसाठी लागणाराही खर्च पाहता उत्पन्न उद्दिष्टापासून दूरच आहे.

दररोज होणाऱ्या बारा फेऱ्यांमधून सरासरी १८ हजार प्रवासी प्रवास करतात.

म्हणजेच प्रत्येक फेरीतून दररोज दीड हजार प्रवासी प्रवास करत असल्याची माहिती पश्चिम रेल्वेने दिली. वातानुकूलित लोकल गाडीची एकूण प्रवासी क्षमता ५ हजार ९६४ आहे. यात १ हजार २८ प्रवासी आसनक्षमता व ४ हजार ९३६ प्रवासी उभ्याने प्रवास करू शकतील. मात्र मिळत असलेला प्रतिसाद पाहता तो कमीच आहे. सध्या दिवसभरात होणाऱ्या १२ फेऱ्यांमध्ये केवळ तीन फेऱ्यांनाच प्रतिसाद मिळत असून उर्वरित लोकल फेऱ्यांना फारसा प्रतिसाद नाही.

# विकास म्हणजे कॉँक्रिटीकरण नव्हे -उद्धव ठाकरे

**मुंबई- केवळ स्वच्छताच नव्हे तर राज्यातील शहरांचे व्यक्तिमत्व अमुलाग्र बदलावे. मुंबईसारख्या जागतिक नकाशावरील महानगराचे केवळ कॉँक्रिटीकरण होऊ नये तर सौंदर्यीकरण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहायक आयुक्त, प्रभाग अधिकारी यांच्याशी संवाद साधला. मुंबईतील पदपथ सुंदर करण्यासाठी आयोजित प्रदर्शनास देखिल त्यांनी भेट दिली.**



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छ मुंबई, सुंदर मुंबई उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या उपाय योजनांची आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी त्यांनी सहायक आयुक्तांशी संवाद साधला. नगरविकास मंत्री श्री. एकनाथ शिंदे, आमदार श्री. आदित्य ठाकरे, श्री. अनिल परब, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, महानगरपालिका आयुक्त प्रवीण परदेशी, पोलीस आयुक्त संजय बर्वे, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त आर. ए. राजीव, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, प्रधान सचिव मनिषा म्हैसकर, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद म्हैसकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले की, मुंबईतील रस्ते, पदपथ, वाहतूक बेटे, उद्याने, मनोरंजन मैदाने, मंडई, शालेय परिसर, आरोग्य, पाणी आदी विविध नागरी सेवा सुविधा जागतिक दर्जाच्या करण्यासाठी प्रत्येकाने एक संघ म्हणून काम करावे. यासाठी मुंबईत असलेल्या विविध शासकीय यंत्रणांनी एकत्रितपणे समन्वय साधावा.

मुंबईत हवा प्रदुषणाबरोबरच दृष्यमानताही कमी होत आहे. यावर उपाय योजण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी महानगरपालिकेने जाहिरात फलक धोरण आखावे. तसेच अवैध व विना परवाने फलक लावून शहराचे सौंदर्य बिघडविणाऱ्यांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करावी. अवैध फलकांना आळा घालण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांशी स्वतः संवाद साधू, असेही श्री. ठाकरे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले की, शहरामध्ये जागोजागी डेब्रिज, कचरा टाकणाऱ्याविरुद्ध कारवाई करावी. तसेच डेब्रिज, कचरा वेळोवेळी उचलण्यात यावा, यासाठी मुंबई डेब्रिजमुक्त व कचरा मुक्त करण्यासाठी कालमर्यादा ठरविण्यात यावी. तसेच वाहतूक बेटांचे सुशोभिकरण करणे, पदपाथ सुव्यवस्थित राखणे, रेलिंग व्यवस्थित ठेवणे, स्थानिक वातावरणात टिकणारी व फुलणारी झाडे लावणे आदी कामांना प्राधान्य द्यावे.

# ओल्या कचऱ्यावर धावणार बस! नवी मुंबई महापालिकेचा प्रकल्प

**नवी मुंबई-** ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून बायोमिथेन गॅस तयार करण्याचा प्रकल्प उभारण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. तुर्भे कचराभूमीवर हा प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पातून तयार होणारा गॅस एनएमएमटीच्या बस चालवण्यासाठी वापरला जाणार आहे. महापालिकेच्या या प्रकल्पामुळे शहरातील ओल्या कचऱ्याचा प्रश्न मिटणार असून, एनएमएमटीच्या



इंधनवर होणाऱ्या खर्चात बचत होणार आहे. नवी मुंबई शहरातून दैनंदिन तब्बल ८०० मेट्रिक टन कचरा तुर्भेच्या कचराभूमीवर गोळा होतो. या कचऱ्यातून प्लास्टिक, सॅनेटरी नॅपकिन, पॅड, थर्माकोल आदी कचरा वर्गीकरण केल्यावर सुमारे ३०० ते ३५० टन ओला कचरा शिल्लक राहतो. वर्गीकरणानंतर शिल्लक राहिलेल्या या कचऱ्यावर नंतर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया केली जाते. परंतु ओल्या कचऱ्यातील काही वस्तूंना पूर्णपणे नष्ट होण्यास बराच कालावधी लागत असल्यामुळे सध्या तुर्भेच्या जागावर कचऱ्याचा भलामोठा डोंगर उभा राहत आहे. हा कचरा सडण्याच्या प्रक्रियेतून मोठ्या प्रमाणात मिथेन वायूची निर्मिती होते. याचा वापर वीजनिर्मिती; तसेच वाहन चालवण्यासाठी केला जाऊ शकतो. गेल्या अनेक वर्षांपासून हा वायू असाच हवेत वाया जात आहे. परंतु आता या वायूचा वीजनिर्मितीसोबतच एनएमएमटीच्या बस चालवण्यासाठी उपयोग केला जाऊ शकतो, असा अभिप्राय असणारा प्रस्ताव अभियांत्रिकी विभागाने तयार केला आहे. तुर्भे क्षेपणभूमी येथील कार्यरत असलेला पाचवा विभाग बंद केला जाणार आहे. त्यामुळे आता सहावा विभाग विकसित केल्यावर यातील दैनंदिन नागरी घनकचऱ्याची शास्त्रोक्तरीत्या विल्हेवाट लावण्यात येणार आहे. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी बायोमिथनायझेशन प्रकल्प उभारणे प्रस्तावित केले आहे. या प्रकल्पातून तयार होणारा मिथेन गॅसवर एनएमएमटीच्या चालवण्याचे पालिकेच्या विचाराधीन आहे. तुर्भे कचराभूमीवर बायोमिथेन तयार करणारे दोन प्रकल्प तयार केले जाणार आहेत. ४० मेट्रिक टनाचा एक प्रकल्प असे दोन प्रकल्प प्रस्तावित आहेत.

# देशात दिवसाला १२४ तर मुंबईत दररोज दोघांचा बळी घेतोय 'हा' आजार

**मुंबई-** फुफ्फूसाच्या कर्करोग शेवटच्या टप्प्यात समजत असल्याने उपचार करणे अवघड होते. मुंबईत कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूपैकी फुफ्फूसाच्या कर्करोगाचे प्रमाण सर्वाधिक आहे. शहरात दिवसाला सरासरी दोन जणांचा मृत्यू फुफ्फूसाच्या कर्करोगाने मृत्यू होतो.

मुंबईत २०१४ मध्ये फुफ्फूसाच्या कर्करोगाने ८३१ जणांचा मृत्यू झाला. तर, २०१५ मध्ये ६८२ जणांचा मृत्यू झाला. २०१५ मध्ये कर्करोगाने मृत्यू होणाऱ्या पैकी १२.८ टक्के जणांचा फुफ्फूसाच्या कर्करोगाने बळी घेतला होता. तर, २०१४ मध्ये हे प्रमाण १३.९ टक्के होते. तर, २०१८ मध्ये संपुर्ण देशात ४५ हजार ३६३ जणांचा मृत्यू झाला होता. साधारणत: कर्करोग हा पहिल्या किंवा दुसऱ्या टप्प्यात लक्षात आल्यास त्यावर यशस्वी उपचार केले जातात. मात्र, फुफ्फूसाचा कर्करोग हा तीसऱ्या



आणि चौथ्या टप्प्यात लक्षात येतो. त्यामुळे उपचार करणे अवघड होते. तसेच, फफ्फूसाच्या कर्करोगावरील उपचारही महाग असतात त्यामुळे तुलनेने मृत्यूची संख्या अधिक असते. असे कर्करोग तज्ज्ञ डॉ. विनय देशमाने यांनी सांगितले.

फूफ्फूसाच्या कर्करोगाची आणि क्षयाच्या आजाराची लक्षणही प्रामुख्याने एकसारखी असतात. त्यातच,एक्स रे किंवा सिटीस्कॅनमध्येही पहिल्या टप्प्यात कर्करोग लक्षात येत नाही. त्यामुळे सुरवातील क्षय तसेच इतर आजाराचे उपचार होण्याचे प्रकार जास्त आहेत.त्यामुळे फफ्फूसाच्या कर्करोगाचे बळी जास्त असण्याची शक्यता डॉक्टरांकडून व्यक्त केली जाते. फुफ्फूसाच्या कर्करोगाच्या तपासणीसाठी बायास्पी हा सर्वात प्रभावी पर्याय मानला जातो. त्यात फुफ्फूसाच्या पेशी काढून त्याची तपासणी केली जाते. मात्र, वजन कमी होणे,श्वास घेताना त्रास होणे, खोकल्यातून रक्त येणे, वारंवार खोकला येणे अशी प्राथमिक लक्षणं असतात.

# विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी शौचालयातून!

**मुंबई-** मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील 'युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई लॉ ॲकॅडमी'मध्ये (उमला) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चक्क शौचालयात केली आहे. याबाबत विद्यार्थ्यांनी वारंवार तक्रारी केल्यानंतरही प्रशासनाकडून कोणतीच दखल घेण्यात येत नसल्याने पाणी पिण्यासाठी विद्यार्थ्यांना इतर विभागांमध्ये वणवण करावी लागत आहे. विधी अभ्यासक्रमाला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता मुंबई विद्यापीठाने पाच वर्षांपूर्वी 'युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई लॉ ॲकॅडमी'ची स्थापना केली; मात्र अनेक त्रुटींमुळे हा विभाग कायम चर्चेत राहिला आहे. स्थापनेपासून आजतागायत 'उमला'ला पूर्णवेळ संचालक नसणे, प्राध्यापक-विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंच नसणे, पायाभूत सुविधांची कमरता अशा अनेक समस्या विभागात आहेत. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून ५० हजारांपर्यंत शुल्क घेतल्यानंतरही त्यांना आवश्यक सुविधाही देण्यात विद्यापीठ अपयशी ठरले आहे. विद्यार्थ्यांनी किमान सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी अधिकाऱ्यांकडे केली होती; मात्र त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. 'उमला'चे वर्ग असलेल्या दुसऱ्या मजल्यावर विद्यार्थिनींसाठी पिण्याच्या पाण्याचा कुलर चक्क शौचालयात बसवला आहे. याबाबत विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाला कूलर शौचालयाबाहेर लावून देण्याबाबत तक्रार केली आहे.

# दोन लाखांहून अधिक कर्ज असलेले शेतकरी कर्जमाफीसाठी अपात्र

**मुंबई-** शेतकऱ्यांचे दोन लाखांपर्यंतचे सरसकट कर्ज माफ केले जाईल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले असले तरी शुक्रवारी जाहीर करण्यात आलेल्या सरकारी अध्यादेशात पुनर्गठन केलेल्या कर्जाची मुद्दल व व्याजाची थकबाकी दोन लाखांपेक्षा अधिक असणारे खातेदार शेतकरी कर्जमाफी योजनेत पात्र ठरणार नाहीत, अशी तरतूद करण्यात आली आहे.सरकारी आदेशानुसार सरसकट शेतकरी कर्जमाफीच्या योजनेसाठी पात्र ठरणार नाहीत. सरकारचा हा निर्णय भयानक असल्याची प्रतिक्रिया शेतकरी नेते डॉ. अजित नवले यांनी व्यक्त केली.सरकारी अधिकारी, कर्मचारी (चतुर्थ श्रेणी वगळून), मंत्री, खासदार, आमदार, २५ हजारांपेक्षा जास्त निवृत्ती वेतनधारक यांना कर्जमाफीच्या योजनेतून वगळण्यात आले आहे.



# देशातील युवकाला अराजकतेची चीड - पंतप्रधान नरेंद्र मोदी

**मुंबई-** देशातील युवकांना अराजक बिलकूल आवडत नसून अव्यवस्था आणि अस्थिरतेमुळे देशातील युवकांच्या मनात चीड निर्माण झाली आहे, असे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशभरात नागरिकत्व कायदा आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणीवरून होत असलेल्या हिंसक आंदोलनांच्या संदर्भात पंतप्रधानांच्या या वक्तव्याकडे पाहिले जात आहे. पंतप्रधान मोदी आपला मासिक कार्यक्रम 'मन की बात'मध्ये विचार मांडत होते. ज्यांचा जन्म २१ व्या शतकात झाला आहे, असे युवक येणाऱ्या दशकाला गती देण्यात मोठी आणि महत्वाची भूमिका निभावतील असे मोदी म्हणाले. महत्त्वाची भूमिका घेणारे युवक हे मुद्दे समजून घेतच लहानाचे मोठे झाले आहेत. अशा सर्व युवकांना अनेक नावांनी ओळखले जाते. काही लोक त्यांना मिलेनियल म्हणतात, तर काही त्याना जेड किंवा जनरेशन जेड या नावाने ओळखतात. ही सोशल मीडिया पिढी आहे ही गोष्ट तर प्रत्येकाच्या



डोक्यात चांगलीच ठसलेली आहे. आमची ही पिढी अतिशय प्रतिभावान आहे याचा अनुभव आम्हाला येतच आहे. काही तरी वेगळे करण्याचे या युवकांचे स्वप्न असते, अशा शब्दांत पंतप्रधानांनी नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या युवकांचे वर्णन केले. पंतप्रधान मोदी आपल्या 'मन की बात'मध्ये पुढे म्हणाले की, या पिढीचा स्वत:चा एक विचार आहे. सध्याच्या काळात देशातील युवक व्यवस्थेच्या बाजूने आहेत, ही सर्वाधिक आनंदाची गोष्ट आहे. त्यांचा व्यवस्थेवर विश्वास आहे, मात्र जर व्यवस्थेने योग्य पद्धतीने त्यांना प्रतिसाद दिला नाही, तर ते अस्वस्थ होतात आणि मोठ्या हिमतीने ते व्यवस्थेला प्रश्न विचारतात. आणि हे अतिशय योग्य असल्याचे मी मानतो.

मात्र, देशाचे युवक अराजकतेच्या बाजूने नाहीत हे निश्चित. अव्यवस्था आणि अस्थिरतेबाबत त्यांच्या मनात चीड आहे. ते घराणेशाही, जातीयवाद, आप-पर, स्त्री-पुरुष भेद अशा गोष्टींच्या विरोधात आहेत. जेव्हा विमानतळांवर किंवा सिनेमागृहांमध्ये जेव्हा रांग तोडण्याचा प्रयत्न होतो, तेव्हा याला सर्वात प्रथम विरोध युवकच करत असतो. ही एक नव्या प्रकारची व्यवस्था आहे. नव्या प्रकारचे युग आहे. आज भारताला याच पिढीकडून अपेक्षा आहेत.

# महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद पेटला

**मुंबई-** 'महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांना महाराष्ट्र–कर्नाटक सीमेवर उभे करुन गोळ्या घाला', असे वादग्रस्त वक्तव्य कर्नाटक नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष भीमाशंकर पाटील यांनी केले होते.

त्यांच्या या वक्तव्यानंतर महाराष्ट्रातून संतप्त प्रतिक्रिया उमटत असतानाच कर्नाटकात कन्नड वेदिका संघटनेनेही आक्रमक पवित्रा घेतला आहे. परिणामी, वातावरण तापू लागल्याने दोन्ही राज्यातील परिवहन महामंडळाने दक्षतेचा उपाय म्हणून एसटी सेवा बंद केली आहे. सीमाभागात तणाव निर्माण झाला आहे. पुढील आदेश मिळेपर्यंत बससेवा बंद राहील, अशी माहिती मिळाली आहे. उभय राज्यातील प्रवाशी कोल्हापूर, कागल, निपाणी,बेळगाव अशा बस स्थानकांमध्ये अडकलेत. दुसरीकडे, दोन्ही राज्यातील मुख्यमंत्र्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले जात आहे. अशातच, आज बेळगाव येथे चंदगडचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे

## दोन्ही राज्यातील एसटी वाहतूक बंद



आमदार राजेश पाटील यांचा महाराष्ट्र एकीकरण युवा समिती मार्फत आणि समस्त बेळगावकर सीमावासियांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. अनगोळ येथे आदर्श मल्टिपर्पज सोसायटी सभागृहात दुपारी ३ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. मात्र, महाराष्ट्र एकीकरण समितीने आयोजित केलेला कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा कन्नड वेदिका संघटनेने दिला आहे. भीमाशंकर पाटील यांच्या वादग्रस्त वक्तव्याला उत्तर देताना शिवसेनेचे खासदार धैर्यशील माने यांनी, 'कधी आणि कुठे गोळ्या घालणार आहात याची तारीख आणि वेळ सांगा, पाहूया तुमच्या गोळ्या कमी पडतात की आमची माणसे, याचे उदाहरण घालून देऊ' असा इशारा दिला होता. याच वादाचे हे पडसाद असलेले दिसत आहे. शिवसेनेचे खासदार धैर्यशील माने यांनी त्याला तसेच करड्या भाषेत प्रत्युत्तर दिले. मात्र आता हा वाद चांगलाच चिघळला गेला असल्याचे दिसत आहे.

सीमाप्रश्नाची धग तापल्याचे पाहून कर्नाटक राज्यात जाणाऱ्या आणि येणाऱ्या सर्व बस रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून शनिवारी मध्यरात्रीपासून सर्व बस रद्द करण्यात आल्या आहेत. तणाव आणि नुकसान टाळण्यासाठी पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. पुढील आदेश मिळेपर्यंत बससेवा बंद ठेवण्याचे निर्देशही पोलिसांनी परिवहन महामंडळाला दिले आहेत. यामुळे उभय राज्यात प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांची कोंडी झाली आहे. खाजगी, शेअर वाहतुकीचा मार्ग प्रवाशी शोधत आहेत.

## संपादकीय...

# धर्मनिरपेक्षतेला बळ देणारा कायदा



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

गेल्या दहा दिवसांत विरोधकांनी सुधारित नागरिकत्व कायद्यावरून सरकारविरोधी आंदोलन पेटवले आहे. त्यांनी या कायद्यासंदर्भात हेतुपुरस्सर अपप्रचार करत भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. देशहिताशी देणेघेणे नसलेल्या शक्तींना एकत्र करून आणि चुकीच्या निष्कर्षांचा आधार घेत काही लोक सार्वजनिक संपत्तीची जाळपोळ आणि पोलिसांवर हल्ले करीत आहेत. गांधीजींच्या शांततामय विरोधाच्या तत्त्वांना हरताळ फासत हिंसक आंदोलन केले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील सभेत बोलताना सुधारित नागरिकत्व कायद्याविषयीचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. हा कायदा नेमका कोणासाठी, सरकारचा हेतू काय, हे त्यांनी सांगितले. सुधारित नागरिकत्व कायदा हा भारताच्या विविधांगी आणि सर्वसमावेशक संस्कृतीचे प्रतीक आहे. देशातले मलबार ज्यू, सीरियन ख्रिस्ती, पशिऱ्यातून आलेले पारसी किंवा माझ्या पालकांसारखे फाळणीतील हिंसाचारामुळे पळून आलेले शीख नागरिक, अशा सर्वांना या भूमीने आश्रय दिला.

या आणि अशा गोष्टींचे मिळून आपल्या सर्वसमावेशक सांस्कृतिक परंपरेचे चरित्र घडले आहे. सुधारित नागरिकत्व कायदा देशाच्या याच सर्वसमावेशक स्वरूपाच्या प्रेरणेतून घडला असून, आपल्या सांस्कृतिक मूल्यांचा वारसा पुढे नेणारा आहे. काही देशांमध्ये धार्मिकदृष्ट्या अल्पसंख्याक नागरिकांवर अत्याचार होत असतात. या पार्श्वभूमीवर पाकिस्तान किंवा इतर देशांतून भारतात आलेल्या व्यक्तींना आश्रय देण्याचे काम हा कायदा करणार आहे.

त्याबरोबरच सुधारित नागरिकत्व कायदा काय करणार नाही, हे बघणेही तेवढचे महत्त्वाचे आहे. हा कायदा कोणत्याही भारतीय नागरिकाचे अधिकार हिरावून घेणार नाही, मग ती व्यक्ती कुठल्याही धर्माची, जातीची, पंथाची, वंशाची अथवा समुदायाची असो. या कायद्यामुळे भारतीय अल्पसंख्याकांना धोका असल्याचा जो वाद निर्माण केला जात आहे, तो म्हणजे अज्ञान आणि लबाडी एकाच वेळी कशी केली जाते याचे उदाहरण आहे. नागरिकांच्या मनात धार्मिक आधारावर भीतीचे वातावरण निर्माण करणे, विशेषतः त्यासाठी युवकांचा वापर करणे, हे गलिच्छ राजकारण आहे. सुधारित नागरिकत्व कायदा म्हणजे, तीन शेजारी देशांमधल्या सर्व नागरिकांना दिलेले खुले आमंत्रण नाही. काही विरोधक जाणूनबुजून तसा प्रचार करत आहेत. या कायद्यानुसार ३१ डिसेंबर २०१४ ही कालमर्यादा निश्चित करण्यात आली असून, जे निर्वासित आधीच भारतात आलेले आहेत, मात्र मूलभूत अधिकारांपासून वंचित आहेत, केवळ त्यांनाच नागरिकत्व देण्याची तरतूद या कायद्यात आहे. सुधारित नागरिकत्व कायद्यात ज्या अल्पसंख्याक समुदायांचा समावेश आहे, त्यावर आक्षेप घेताना असा मुद्दा मांडला जातो, की केवळ या धार्मिक समुदायांना (हिंदू, शीख, जैन, बौद्ध, ख्रिस्ती आणि पारसी) या तीन देशांत छळ सहन करावा लागला असे नाही. हे तिन्ही देश मुस्लीम आहेत. त्यामुळे या देशांमध्ये धार्मिक आधारावर मुस्लिमांचा छळ होणे, हा मुद्दाच असू शकत नाही. मात्र, याचा अर्थ असाही नाही, की ज्या मुस्लिमांना तेथे इतर कोणत्या त्रासाचा सामना करावा लागला, ते भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज करू शकत नाहीत. खरे तर गेल्या पाच वर्षांत मोदी सरकारने याच तीन देशांतील ६०० मुस्लीम नागरिकांना नागरिकत्व दिले आहे.




# नववर्षात सर्व इच्छा एकदिलाने पूर्ण करू!

**खरे तर निसर्गाने काळाचे विभाजन दिवस आणि रात्रीत केलेले आहे! रोज सूर्योदय आणि सूर्यास्त होणे हा निसगनियम आहे, परंतु माणसाने आपल्या सोयीसाठी काळाचे सेकंद, मिनीट, तास, चोवीस तास, आठवडा, महिना आणि वर्ष असे खंड पाडून घेतले! हा हिशेब अचूक व्हावा, यासाठी दर चौथे वर्ष 'लीप ईअर' मानायचे ठरले आणि त्या वर्षी फेब्रुवारी महिन्यास २९वा जास्तीचा दिवस दिला गेला. तरीही काळाचा महिमा असा की 'लीप सेकंद' जुळवून घेण्याचीही गरज पडते. म्हणूनच २०२० या नव्या वर्षाची खासियत अशी असेल की, पृथ्वीची परिवलन गती आणि आपली घड्याळे यांचा ताळमेळ बसावा, यासाठी ३० जूनच्या आसपास जगभरातील घड्याळे एक सेकंद पुढे करून 'अॅडजेस्ट' करावी लागतील.**

वर्ष २०१९ काळाच्या पडद्याआड जाणार आहे. या वर्षाच्या गेल्या ५१ आठवड्यांत या स्तंभातून ताज्या प्रासंगिक विषयांवर मी माझी मते तुमच्यापुढे मांडत आलो. या वर्षातील हा ५२वा स्तंभ आहे. एक पत्रकार या नात्याने सामान्य माणसाची नस मला ओळखता येत असल्याने, या स्तंभातून मांडलेली माझी मते ही नक्कीच तुमचीही मते असणार याची मला खात्री आहे. या स्तंभासाठी कोणता विषय घ्यावा, यासाठी येणारे ई-मेल व पत्रे यावरून तुमची आत्मीयता दिसून येते. आपल्या सर्वांच्या इच्छा-आकांक्षा एकसारख्याच तर आहेत! आपला देश स्वस्थ, सुखी व खूश असावा, हिच तर आपली इच्छा आहे. आपल्या इच्छा नक्कीच पूर्ण होऊ शकतात. कारण प्रत्येक भारतीयात तशी क्षमता आहे! शतकानुशतके आक्रमणे सोसूनही आपल्या देशाने वेगळेपण टिकवून ठेवले, हिच तर खरी आपल्या अपार क्षमतांची खरी ओळख. मग प्रश्न असा पडतो की, आपण कमी कुठे पडतो? मला हा प्रश्न नेहमीच सलत असतो व देश-विदेशात फिरताना मी याचे उत्तर शोधण्यासाठी तुलनात्मक अभ्यासही करत असतो. युरोपात गावोगावी सुंदर उद्याने आहेत. गुळगुळीत सपाट रस्ते आहेत व आखीव-रेखीव फूटपाथ आहेत. लोक वाहनांचे पार्किंगही ठरलेल्या जागी न चुकता करताना दिसले. मग आपल्याला हे का जमू नये, असा मला प्रश्न पडतो. आपल्याकडे गावातील तर सोडाच, पण मोठ्या




शहरांमध्येही वाहतुकीच्या बेशिस्तीने लोक त्रस्त आहेत. वाहतूक नियमांचे उल्लंघन न करण्याचे आपण सर्वांनी मनापासून ठरविले, तर हे चित्र बदलायला फार वेळ लागणार नाही. आपण जनआंदोलन हाती घेतले, तर आपल्या नद्यांचे पुनरुज्जीवन नक्कीच होईल. या सर्व गोष्टी यशस्वीपणे केल्याची असंख्य उदाहरणे आपल्या देशात आहेत. तेव्हा नव्या वर्षात संकल्प करा की, पाण्याची नासाडी करणार नाही व जलस्रोतांचे संवर्धन करीन. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुण्यस्मरण करीत आपण त्यांची १५० वी जयंती साजरी करीत आहोत. मी स्वत:ला भाग्यशाली समजतो की, बापूजींची दक्षिण आफ्रिका येथील क्रांतिभूमी, डरबन येथील गांधी स्मारक आणि जेथे त्यांनी वकिलीची सुरुवात केली त्या जोहान्सबर्ग येथील त्यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होण्याची संधी मला मिळाली. जोहान्सबर्गमधील गांधी स्क्वेअर येथे गांधीजींचा असा पुतळा पाहावयास मिळतो की जो आजवर इतरत्र कोठे पाहावयास मिळाला नाही. त्यांच्या युवावस्थेतील बॅरिस्टरच्या रूपातील हा पुतळा आहे. बापूजींची ही क्रांतिभूमी आणि सुरुवातीच्या कर्मभूमीवर वारंवार हा सवाल माझ्या मनात येत राहिला की, बापूजींच्या स्वप्नातील भारत आपण केव्हा बनवू शकू? ...तर या वर्षी आपण सर्व संकल्प करूया की सत्य, अहिंसा आणि विनयशीलतेच्या अधिष्ठ ानावर असा भारत निर्माण करू, जो जाती आणि सर्वधर्मांच्या विचारांच्या वर असेल आणि जेथे केवळ मानवतेचेच महत्त्व असेल.

भारत हा कृषिप्रधान देश आहे व सुमारे ७० टक्के लोकांचा चरितार्थ प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे, पण आपल्या खेड्यांची अवस्था काय आहे? युरोपमधील गावांच्या तुलनेत आपण कुठे बसतो? शेतकऱ्यांची खुशाली तर दूरच राहिली, त्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठीही आपण फारसे काही करू शकलेलो नाही. त्यामुळे दुसरा संकल्प जरूर करा की, शेतकऱ्यांसाठी काय करताय, याचा जाब आपल्या लोकप्रतिनिधींना विचारीन.

नव्या वर्षाकडून अपेक्षा करू या की, पाऊसपाणी वेळेवर होईल आणि शेतीचे भरघोस पीक येऊन शेतकड्यांच्या जीवनात सुख येवो. नव्या वर्षात, वाहतुकीचे साधन नाही, म्हणून कोणालाही आपल्या पत्नीचे शव इस्पितळातून खांद्यावरून गावी न्यावे लागणार नाही, अशीही अपेक्षा ठेवू या! आपल्या आरोग्य केंद्रांचे आरोग्य सुधारावे, सर्व मुलांनी शाळेत जावे व कॉन्व्हेंटला मागे टाकतील, एवढ्या सरकारी शाळा चांगल्या व्हाव्यात, अशीही अपेक्षा आपण करू या. देशाची आर्थिक भरभराट होवो, उद्योग-धंदे उत्तम चालावेत आणि प्रत्येक हाताला काम मिळेल, हे स्वप्नही आपण नव्या वर्षात उराशी वाळगू या. ज्याने जीवन समृद्ध होईल, अशा इच्छा मना ठेवा आणि सर्वांनी त्यासाठी एकदिलाने कामाला लागा!

संपूर्ण 'पोलिस बातमी पत्र' परिवारातर्फे वर्ष २०२०साठी मनापासून भरपूर शुभेच्छा. खुश राहा, आनंदी राहा आणि समाधानी राहा!

# ३१ डिसेंबरच्या पार्ट्यांवर नजर: क्लब, पब हॉटेल्सची झाडाझडती



**मुंबई-** नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या पार्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दारूचे सेवन केले जाते. याचाच गैरफायदा घेत महाराष्ट्रात शेजारील राज्यातून मोठ्या प्रमाणात बेकायदा मद्य आणले जाते, बनावट दारू, भेसळ दारूची विक्री केली जाते. यामुळे सरकारचा महसूल बुडतोच पण त्याचबरोबर भेसळयुक्त दारू नववर्षाचा जल्लोष करणाऱ्यांच्या जीवावर बेतण्याची भीती असते. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाने डिसेंबरच्या शेवटच्या विशेष मोहीम हाती घेतली असून शहर आणि उपनगरांत विना परवाना पार्ट्या, बेकायदा दारू, बनावट दारू विक्री रोखण्यासाठी विशेष पथके तयार केली आहेत.

नववर्षासाठी नाताळपासूनच मुंबईतील गल्लीबोळापासून ते पंचतारांकित हॉटेलपर्यंत मोठ्या प्रमाणात पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले. या पार्ट्यांमध्ये दारू पिण्याकडे लोकांचा अधिक ओढा असतो. महाराष्ट्राच्या सीमेलगत असलेल्या गोवा, दमण, दादरा, नगर हवेली, सिल्वासा याठिकाणी तुलनेने मद्य स्वस्त दरात मिळते. ही दारू बेकायदा मार्गाने आणण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच स्वस्तातील दारू घेऊन तिच्यामध्ये पाणी तसेच इतर द्रव्यांची भेसळ करून ब्रँडेड दारू स्वस्तात सांगून ती विकली जाते. नजीकच्या काळात राज्य उत्पादन शुल्क विभागाने बनावट दारू बनविणारे तसेच विक्री करणाऱ्यांची मोठ्या प्रमाणात धरपकड केली. ३१ डिसेंबरसाठी अशाप्रकारे बेकायदा आणि बनावट दारू विकली जाऊ नये यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग सज्ज झाले आहे. मुंबईतील दक्षिण मुंबईपासून वांद्रे परिसरापर्यंतची जबाबदारी अधीक्षक सी. बी. रजपूत यांच्याकडे आहे. शहरात प्रभावी नियंत्रणासाठी नऊ कार्यकारी निरीक्षक तर दोन भरारी अशी मिळून एकूण ११ पथके सज्ज आहेत. उपनगरांतील जबाबदारी असलेल्या स्नेहलता श्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली १४ कार्यकारी निरीक्षक आणि २ भरारी अशी १६ पथके तैनात असतील. दिवस-रात्र गस्त, क्लब, पब तसेच अन्य ठिकाणी असलेल्या पार्ट्यांची तपासणी, संशयित वाहनांची तपासणी, बेकायदा दारू विक्रेत्यांचा शोध, दुकाने-बार तसेच इतर आस्थापना दिलेल्या वेळेत बंद करणे या सर्वांवर या पथकातील अधिकारी आणि कर्मचारी यांची नजर असेल.

पृष्ठ १ वरुन

## अखेर महाविकासआघाडीच्या २६ कॅबिनेट तर १० राज्यमंत्र्यांकडून शपथ

सरकारचा मंत्रिमंडळ विस्ताराचा शपथविधी सोहळा विधिमंडळ परिसरात संपन्न झाला. एकूण ३६ आमदारांना राज्यपालांनी पद आणि गोपनियतेची शपथ दिली. अजित पवार, अशोक चव्हाण, दिलीप वळसे पाटील, आदित्य ठाकरे आणि जितेंद्र आव्हाड यांच्यासह २६ आमदारांनी कॅबिनेटमंत्रिपदाची शपथ घेतली. तर दहा आमदारांनी राज्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

राज्यातील सत्ता स्थापनेच्या नाट्याला वेगळं वळण देणारे राष्ट्रवादीचे नेते अजित पवार पुन्हा एकदा सत्तेत आले आहेत.

झालेल्या मंत्रिमंडळ विस्ताराच्या कार्यक्रमात अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवार यांनी अवघ्या दीड महिन्यात दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चार दिवसांच्या सरकारच्या काळात त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम केलं होतं.

### मंत्रिमंडळात तीन महिला मंत्री

उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात फक्त तीन महिला आमदारांना संधी देण्यात आली आहे. मंत्रिमंडळात वर्षा गायकवाड, यशोमती ठाकूर आणि आदिती तटकरे यांचा समावेश करण्यात आला आहे. काँग्रेसकडून वर्षा गायकवाड आणि यशोमती ठाकूर यांना कॅबिनेटमंत्रिपद देण्यात आलं आहे. तर राष्ट्रवादीनं आदिती तटकरे यांच्याकडे राज्यमंत्रिपद सोपावलं आहे. शिवसेनेकडून एकाही महिला आमदाराला मंत्रिपद दिलं नाही.

## अखेर आयुक्तांना आली जाग

लांब व ३० फूट रुंद असे हे काम चक्क मैदानातच बांधण्यास घेतले. त्यासाठी मैदानात दगड आणून टाकण्यात आले. आधीच मैदान अपुरे असताना त्यात भरमैदानात पालिकेने हे काम सुरू केल्याने खेळाडू व नागरिक संतापले. त्यांनी थेट आयुक्तांची भेट घेऊन याला विरोध केला.

खतगावकरांनी कार्यकारी अभियंता दीपक खांबित, उद्यान अधीक्षक नागेश वीरकर यांच्यासह कामाची पाहणी केली. यावेळी मैदानातील नेहमीचे खेळाडू असलेले पोलीस निरीक्षक विजय पाटील, लाला माछी, हितेश माछी, अविनाश पाटील, विजय पाटील, पराग पाठारे, गणेश जाधव, वॅली रॉड्रिक्स, शैलेश म्हामुणकर आदींनी आयुक्तांकडे आपल्या तक्रारी केल्या. आयुक्तांनीही भरमैदानातील काम पाहून ते रद्द करण्यास तसेच पालिकेच्या पडीक टाकीजवळ ते प्रस्तावित करण्यासाठी आराखडा तयार करा, असे खांबित यांना सांगितले.

## नव्या वर्षातही रोजगार संकटात पगारवाढीचंही काही खरं नाही!

'नवीन रोजगारांच्या बाबतीत २०२० हे वर्ष उदासिन राहील. रोजगारवाढीचा विचार केला तर नववर्षात किरकोळ रोजगारवाढ होण्याची चिन्हे आहेत. सप्टेंबरअखेरच्या जीडीपी दरात आणखी घसरण झाली आहे. जीडीपीतील ही घसरण पुढील वर्षाच्या पहिल्या तिमाहीपर्यंत तरी राहील, अशी शक्यता आहे. केंद्र सरकारने केलेल्या उपाययोजनांचे चांगले परिणाम दिसण्यास आणखी काही काळ जावा लागेल. देशांतर्गत क्रयशक्ती व मागणी यात वाढ झाली तरच जीडीपीच्या दरात वाढ होईल व त्यानंतर आपण रोजगारवाढीची आशा करू शकू,' असे मत इंडियन स्टाफिंग फेडरेशनचे अध्यक्ष रितूपर्णा चक्रवर्ती यांनी व्यक्त केले.

'जीडीपीच्या दरामध्ये होत असलेल्या घसरणीमुळे नववर्षाची पहिली तिमाही रोजगारांसाठी फार उत्साहवर्धक नसेल. घटत्या जीडीपीदराची प्रतिक्रिया उद्योगक्षेत्रात उमटत आहे. या स्थितीत व्यवसायविस्तार, नोकरभरती किंवा नवीन काही करण्याबाबत कंपन्या सावधपणे पावले टाकत आहेत,' असे ग्लोबलहंट इंडियांचे व्यवस्थापकीय संचालक सुनील गोयल यांनी सांगितले.

२०२०मध्ये पगारवाढीच्या बाबतीतही बहुतांश आस्थापने आखडता हात घेतील. मात्र उच्चकोटीची कौशल्य बाळगणाऱ्या तसेच, विशिष्ट कौशल्य असणाऱ्या उमेदवारांसाठी या कंपन्या हात सैल सोडतील, असे निरीक्षण या विश्लेषकांनी नोंदवले आहे.

### वाहन उद्योग संकटात

सरत्या वर्षात ऑक्टोबरचा अपवाद वगळता वाहन उद्योगक्षेत्रामध्ये मंदीचे वातावरण आहे. कारच्या मागणीत व विक्रीत सतत घट होत असल्याने अनेक कंपन्यांनी आपल्या उत्पादनात कपात केली आहे. देशातील प्रमुख रोजगारक्षम उद्योगांपैकी एक असणारा हा उद्योग संकटात सापडल्याने रोजगारनिर्मितीवर विपरीत परिणाम झाला आहे. याशिवाय उत्पादनक्षेत्र व इंजिनीअरिंग क्षेत्रातील रोजगारांसाठीही हे वर्ष वाईट गेले.

### कौशल्यास आजही मागणी

विशिष्ट कौशल्ये राखणाऱ्या उमेदवारांना आजही मागणी असल्याचे दिसत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, डिजिटल मार्केटिंग, डिझाइन थिंकिंग, रोबोटिक प्रोसेस ऑटोमेशन या महत्त्वाच्या कामांसाठी आवश्यक असणारी अऱ्हता असणाऱ्या तरुण-तरुणींचे भवितव्य उज्ज्वल आहे, असे विश्लेषकांनी सांगितले.

### टेलिकॉममध्ये मागणी

सरत्या वर्षात नव्या उमेदवारांना सर्वाधिक मागणी ही टेलिकॉम क्षेत्रामध्ये असल्याचे आढळून आले. बहुतांश टेलिकॉम कंपन्या ५जीच्या तयारीत असून त्यासाठी मोठी नोकरभरती केली जात आहे. टेलिकॉम क्षेत्राकडून होणाऱ्या ऑनलाइन भरतीत चालू वर्षात ३५ टक्क्यांनी वाढ झाली. पर्यटन व आतिथ्यक्षेत्रातही १२ टक्के रोजगारवाढ झाली.

## मानवी हक्क आयोगाकडून पोलिसांना २ लाखांचा दंड

मार्चमध्ये २ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले. त्यानंतर महासंचालकांनी जिल्हा ग्रामीण पोलिसांना पत्र देऊन ही रक्कम तातडीने देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार २४ एप्रिलला गनी यांच्या हाती २ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. १३ वर्षांनंतर मिळाला न्याय अनेक वेळा पोलिस चुकीचे वागतात. कायद्याचा धाक दाखवून खंडणीही मागतात. या प्रकरणात आम्ही निर्दोष होतो. पोलिसांनीच मारहाण केली होती. त्यामुळे मागे हटलो नाही. १३ वर्षे संघर्ष केला. अखेर आम्हाला न्याय मिळालाच, असे जितेंद्र जैस्वाल व गनी पठाण यांनी बोलताना सांगितले.

## '२६/११ नंतर पाकवर हल्ल्याचा प्रस्ताव सरकारने फेटाळला'

**मुंबई-** मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ ला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर आम्ही सरकारला प्रस्ताव दिला होता. पाकिस्तानवर हल्ल्यासाठी हवाई दल पूर्णपणे सज्ज असल्याचं आम्ही सांगितलं होतं. पण सरकारने पाकवर हवाई हल्ला करण्याचा प्रस्ताव फेटाळून लावला, असं माजी हवाई दल प्रमुख बी.एस. धनोआ म्हणाले. व्हीजेटीआय कॉलेजमध्ये तंत्रप्रेमींसाठी 'टेक्नोवान्झा' आयोजित करण्यात आला होता. यासाठी मुंबईतील नव्हे तर मुंबईबाहेरील तरुणी गर्दी केली होती. धनोआ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. पाकिस्तानमध्ये दहशतवाद्यांची छुपी तळं कुठे आहेत याची आमच्या माहिती होती. आणि दहशतवाद्यांची ही तळं उद्ध्वस्त करण्यासाठी हवाई दल सज्ज होतं. पण हवाई हल्ला करायचा की नाही? हा निर्णय अखेर राजकीय नेतृत्त्वाने घ्यायचा असतो, असं धनोआ म्हणाले. धनोआ हे चार महिन्यांपूर्वी निवृत्त झाले. ३१ डिसेंबर २०१६ ते सप्टेंबर २०१९ पर्यंत ते हवाई दलाचे प्रमुख होते.



डिसेंबर २००१ मध्ये दहशतवाद्यांनी संसदेवर हल्ला केला होता. यानंतर पाकिस्तानला अद्दल घडवण्यासाठी हवाई हल्ल्याचा प्रस्ताव हवाई दलाने तत्कालीन केंद्र सरकार समोर ठेवला होता. पण त्यावेळी हा प्रस्ताव नाकारण्यात आला, असं धनोआ म्हणाले. 'यापुढे पाकिस्तानच्या दहशतवादी कारवाया सहन करणं भारताला परवडणारं नाही. कारण भारतात दहशतवादी हल्ले घडवून भारतापासूनच आपल्याला धोका असल्याच्या उलट्या बोंबा पाकिस्तान मारत आहे', असं धनोआ म्हणाले.

पाकिस्तानला काश्मीर मुद्दा सतत ज्वलंत ठेवायचा आहे. यामुळे पाकिस्तान आंतरराष्ट्रीय समुदायासमोर कायम भारताविरोधात राग आवळतो आणि दुसरीकडे दहशतवादी कारवाया सुरू ठेवतो. जमीन, हवेत आणि पाण्यावरील कुठल्याही लढाईठीही हवाई दल सज्ज आहे. भविष्यातील युद्धासाठी हवाई दल सक्षम आहे, असं धनोआ यांनी स्पष्ट केलं.

# प्रगत भारत घडविण्यासाठी सुशिक्षित बेरोजगार लोकाभिमुख मोहिमेचा फायदा घेऊन नोकर बनू नका नवीन उद्योजक बना- विजय भटकर

**अकोला-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी गाडगे महाराज स्मृती दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. या शुभ प्रसंगी महामहिम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, प्रख्यात उद्योगपती किशनभाऊ राठोड, अविनाश भाऊ राठोड इत्यादी सत्यशोधक सेवा समितीचे संस्थापक, ऑटोटेक सेंटर लिमिटेड, मुंबई (सीएमडी), मान्यवर उपस्थित होते. सत्यशोधक सेवा समिती इंडियाचे संस्थापक अध्यक्ष अविनाश भाऊ राठोड, डॉ. विजय भटकर साहेब राष्ट्रीय अध्यक्ष - प्रगत भारत मोहीम, भारत सरकार, नवी दिल्ली आणि सत्यशोधक सेवक समितीचे कुलगुरू आणि सत्यशोधक सेवा समिती, बिहारचे कुलगुरू नालंदा विद्यापीठ. भारत मोहिमेच्या संदर्भात सादर केले. प्रगत भारत मोहिमेअंतर्गत मोहिमेचा प्रसार करण्यासाठी तरुण, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना मोठ्या संख्येने तरुणांच्या योगदानाने भारत प्रगत भारत बनवावे लागेल, असे या निवेदनात नमूद केले आहे. डॉ. विजय भटकर यांनी इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून देशातील शहरी व ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांना काही मिनिटांची भेट देऊन योग्य मार्गदर्शन करण्यासाठी वेळ मागितला. डॉ. विजयजी भटकर यांनी संस्थापक अध्यक्ष अविनाश राठोड यांच्याशी चर्चा केल्यानंतर ऑटोटेक लिमिटेड सेंटर (सीएमडी) किसनभाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली भारतभरातील तरुण सुशिक्षित बेरोजगारांना कमी किंमतीत फ्रेंचायजी देण्याची विनंती केली. किसनभाऊ राठोड सहमत होते. ज्ञानियोगी डॉ. विजयजी भटकर यांनी सक्षम बनून या सामाजिक, आर्थिक दृष्टीसाठी शुभेच्छा दिल्या. किसनभाऊ राठोड यांनी डॉ.विजय भटकर यांना संस्थेच्या माध्यमातून नियोजन योजनेची माहिती दिली. तरुणांना उद्योजक बनवण्याच्या मोहिमेचा भाग म्हणून ग्रामीण व शहरी भागातील तरुणांना अनेक व्यवसाय मिळाले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन, कौशल्य भारत अंतर्गत प्रशिक्षण, छोट्या व्यवसायाचे प्रशिक्षण, चहा कॉफी स्टॉलशी संबंधित लहान मध्यम व्यवसायाची विविधता, दुचाकी, तीन चाकी, चारचाकी वाहन, मोटार कारचे गॅरेज दुरुस्ती, किरकोळ दुकान, रियल इस्टेट उद्योग इन्स्टिट्यूट बार्टी पुणे आणि ऑटोटेक सेंटर लि., मुंबई, आणि सत्यशोधक सेवा समिती, त्यांच्या संयुक्त विद्यमान मोफत रहिवासी कौशल्य प्रशिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. पद्मविभूषण ज्ञानयोगी डॉ.विजयजी भटकर साहेब यांनी आपले मत व्यक्त केले की, बेरोजगारांना शिक्षित करण्याच्या लोकाभिमुख मोहिमेचा फायदा घेऊन भारताला एक उत्तम भारत बनविता यावे. त्यांनी भारत सरकारला नाविन्यपूर्ण आणि उद्योजक बनून आपली स्थिती प्राप्त करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास माजी मंत्री शंभर उपस्थित. सत्यशोधक सेवा समिती, सत्यशोधक सेवा समिती, भारतचे संस्थापक अध्यक्ष उषाताई अविनाश राठोड, अभियंता रमेश पवार, महाराष्ट्र राज्य सरचिटणीस सत्यशोधक सेवा समिती आडी माणवार यांनी पुष्प अर्पण करुन वसुधाताई देशमुख यांचे स्वागत केले.



# १ जानेवारीपासून SBI एटीएमचा हा नियम बदलणार

**मुंबई :** ग्राहकांची फसवणूक होऊ नये यासाठी बँकांकडून सुरक्षेच्या दृष्टीने सतत काही ना काही उपाययोजना अंमलात आणल्या जातात. मात्र तरीही ग्राहकांना एटीएम, नेट बँकिंग यासह इतर माध्यमातून फसवणुकीचा सामना करावाच लागतो. देशातील सर्वात मोठी सरकारी बँक स्टेट बँक ऑफ इंडियाने ग्राहकांसाठी आता नवी व्यवस्था आणली आहे. एसबीआयने एटीएममधून पैसे काढण्याच्या नियमात बदल केला आहे, जो १ जानेवारी २०२० पासून लागू होईल.



एसबीआयने आपल्या एटीएममधून पैसे काढण्यासाठी वन टाइम पासवर्ड म्हणजेच ओटीपी सुविधा आणली आहे. देशभरातील सर्व एटीएममध्ये ही सुविधा लागू होणार आहे.

स्टेट बँकेच्या ग्राहकांना १० हजार रुपयांपेक्षा जास्त पैसे काढण्यासाठी ओटीपी टाकावा लागेल, अशी माहिती खुद्द एसबीआयनेच ट्वीट करुन दिली. बँकेत ग्राहकाचा जो नंबर नोंदणीकृत आहे, त्यावर ओटीपी पाठवला जाईल आणि या माध्यमातून पैसे काढता येतील.

# आठ हजार शिक्षक नोकऱ्या गमावणार

**मुंबई- शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनुत्तीर्ण असलेल्या शिक्षकांची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक दत्तात्रय जगताप यांनी संबंधित शिक्षकांची सेवा समाप्त करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच राज्यातील सुमारे आठ हजार शिक्षकांना त्यांनी नोकरी गमवावी लागणार आहे.**

राज्यात १३ फेब्रुवारी २०१३ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षण परिषदेने निश्चित केलेली टीईटी उत्तीर्णतेची पात्रता ३१ मार्चपर्यंत मिळवणे आवश्यक होते. राज्य शासनाकडून केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाला टीईटी उत्तीर्ण होण्याबाबत अतिरिक्त संधी देण्याची विनंती करण्यात आली होती. त्या अनुषंगाने पात्रता नसलेल्या शिक्षकांना तूर्तास सेवेतून न काढण्याची सूचना देण्यात आली होती. मात्र, राज्य शासनाची विनंती केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ३ जून २०१९ च्या पत्राद्वारे फेटाळली. त्यामुळे टीईटी अनुत्तीर्ण शिक्षकांवर २४ ऑगस्ट २०१८च्या शासन निर्णयानुसार सेवा समाप्तीची कारवाई करण्याचे आदेश २५ नोव्हेंबरला दिले होते. त्यानंतर महिनाभराने प्रत्यक्ष



कारवाईचे आदेश प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून देण्यात आले आहेत. प्राथमिक शिक्षण संचालक दत्तात्रय जगताप यांनी महापालिका आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय उपसंचालक, प्राथमिक-माध्यमिकचे शिक्षणाधिकारी यांना कारवाईचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार, १३ फेब्रुवारी २०१३ नंतर नियुक्त झालेले शिक्षक टीईटी परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्यांच्यावर २४ ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयानुसार सेवासमाप्तीचे तोंडी आदेश (स्पीकिंग ऑर्डर) द्यावेत.

त्यानुसार जिल्हा परिषद आणि महानगपालिकांच्या शाळेतील शिक्षकांची सेवा तत्काळ समाप्त करावी, खासगी शिक्षण संस्थांतील अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांच्या सेवा समाप्तीची कारवाई संबंधित संस्थांनी त्यांच्या स्तरावर करावी. खासगी संस्थांनी संबंधित शिक्षकांची सेवा समाप्त न केल्यास त्यांचे वेतन १ जानेवारी २०२० पासून शासनाकडून दिले जाणार नसल्याचे पत्राद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. याचा फटका राज्यातील सुमारे आठ हजार शिक्षकांना बसणार आहे. ज्यावेळेस सरकारला शिक्षकांची गरज होती तेव्हा अपात्र असताना नियुक्तीचे आदेश दिले होते. आता हे आदेश बेकायदा ठरवायचे का? याला नेमके काय म्हणायचे, असा प्रश्न मुंबई मुख्याध्यापक संघटनेचे सचिव प्रशांत रेडीज यांनी उपस्थित केला आहे.




## नागरिकत्व धोक्यात कसं? राहुल गांधींनी सिद्ध करावं; अमित शाहांचं चॅलेन्ज

**नवी दिल्ली-** नागरिकत्व दुरूस्ती कायद्या विरोधात देशभरात आंदोलनं सुरू असताना NPR म्हणजेच, नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर वरून विरोध पक्षांनी केंद्र सरकारवर टीकेची तोफ डागली आहे. एकीकडे काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी, NPR गरिबांवर आकारण्यात आलेला टॅक्स आहे असं म्हणाले, तर एमआयएमचे अध्यक्ष असुदुद्दीन ओवेसीही NPR म्हणजे, NRC ची पहिली पायरी असल्याचे म्हणाले आहेत. दुसरीकडे केंद्र सरकार मात्र नागरिकत्व दुरूस्ती कायद्यामुळे कोणाचंही नागरिकत्व धोक्यात येणार नाही, असं सतत सांगताना दिसत आहे. याच मुद्यावरून शुक्रवारी हिमाचल प्रदेशमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमा दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राहुल गांधी यांना आव्हान देत म्हटलं आहे की, सिद्ध करून दाखवा NRC मुळे एखाद्याचं नागरिकत्व कसं धोक्यात येणार आहे.

# सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?

**मुंबई-** रॅली, मोर्चा काढण्यासह कायद्याचे समर्थन करण्यास आम्हाला कोणीही रोखू शकत नाही. जाळपोळ करणाऱ्यांना सरकार रॅलीसाठी परवानगी देते. देशविरोधी घोषणा देणाऱ्यांना परवानगी मिळते. मग आम्हाला रॅलीसाठी परवानगी नाकारली जाते. त्यामुळे राज्यातील सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय, असा सवाल करत विरोधी पक्षनेते व माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्ला चढवला. संविधान सन्मान मंचच्या वतीने नागरिकत्व कायद्याच्या समर्थनार्थ शुक्रवारी ऑगस्ट क्रांती मैदानाजवळ रॅली काढली. या रॅलीत भाजपचे मुंबईतील खासदार, आमदार सहभागी झाले होते. तसेच विविध समाजाचे प्रचारकही उपस्थित होते. या वेळी बोलताना फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी नागरिकत्व कायद्याचा आग्रह धरला होता. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात आलेल्यांना नागरिकत्व देण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यानुसार आम्ही



कोणाचीही नागरिकता हिसकावून घेणार नाही. २०१४ पूर्वी देशात आले त्यांना नागरिकता देणार आहे. परंतु काही लोकांनी याविरोधात देशात आग लावली आहे. आपली खुर्ची वाचविण्यासाठी देशात आग लावण्याचा प्रयत्न ते करत आहेत, त्यांच्या खुर्च्यांना आग लावण्याचे काम लोक करतील, असा इशाराही फडणवीस यांनी या वेळी दिला. भारतात ३ कोटी बांगलादेशी घुसले आहेत. बांगलादेशी भारतात घुसला असेल तर त्याला देशात ठेवायचे का? असा सवाल फडणवीस यांनी उपस्थितांना विचारला. कालपर्यंत शिवसेना तेच बोलत होती.

# सोशल राईट फौंडेशन ची नवी मीरा-भाईदर महिला कार्यकारणी जाहीर




# कर्जमाफीवरून उद्धव ठाकरेंची डोकेदुखी वाढणार, आघाडीतील नेत्यानेच केली टीका

**कोल्हापूर-** विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली. मात्र त्यानंतर ही कर्जमाफी फसवी असल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला होता. भाजपनंतर आता महाविकास आघाडीतील घटकपक्ष असलेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनीही कर्जमाफीबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

'मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलेल्या कर्जमाफीवर शेतकरी पूर्णपणे नाराज असून या कर्जमाफीची एकूण रक्कम ७ ते ८ हजार कोटीच्या वर जाणार नाही. मग ही कर्जमाफी नेमकी कुणासाठी आहे?' असा सवाल माजी खासदार राजू शेट्टी यांनी केला आहे. 'दोन लाखापेक्षा जास्त कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही असा नियम लावला आहे. यामुळे अनेक शेतकरी अपात्र होतील आणि या योजनेचा त्यांना लाभ मिळणार नाही. अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवून केलेली कर्जमाफी ही चुकीची आहे,' असं मत राजू शेट्टी यांनी व्यक्त केलं आहे. एकीकडे राजू शेट्टी यांनी कर्जमाफीच्या स्वरूपावरून सरकारवर टीका केली असताना किसान महासभेचे नेते डॉ. अजित नवले यांनीही सरकारवर निशाणा साधला आहे. 'शेतकरी कर्जमाफीचा काढण्यात आलेल्या शासनादेश म्हणजे विश्वासघाताची परिसीमा आहे. शेतकऱ्यांना क्रूरपणे फसविले गेले आहे,' असा घणाघात अजित नवाले यांनी केला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)